मुधा क्र. 1

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

GR 248074

दिनांक 01 MAR 2013 वि.नं. ८७००५ ला.नं. ११/९६

श्री. ........................................................

........................................................

रु.( ...... ) चा स्टँप प्रतिज्ञापत्रासाठी रु. ......../-ची

त्यांचे भरती रु. ........ असे स्टँप दिले

राहुल मा. पाटील
स्टँप व्हेंडर
जिल्हाधिकारी कार्यालय आवार
कसबा बावडा, कोल्हापूर.
परवाना नं. ११०१००७

-1 MAR 2013
STAMP HEAD
TREASURY OFFICE,
KOLHAPUR.

मे. नोटरी पब्लिकसो कोल्हापूर यांचे समोर..

// श्री //

प्रभारी प्राचार्या
महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय
मार्केट यार्ड, कोल्हापूर-४१६००५.

- भा डे क रा र प त्र -

कोल्हापूर महानगरपालिका हद्दीमधील श्री शाहु मार्केट यार्ड येथील सर्व्हे नं. ४३३/२१७ नवीन

प्लॉट नं. ३४५ बाबत ..

श्रीमती निवेदिता संभाजीराव माने,
व.व.५१, व्यवसाय शेती व समाजकार्य.
रा. रुकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.
} लिहून घेणार

यांसी.....

बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट, रुकडी
संचलित महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
मार्केट यार्ड, कोल्हापूर तर्फे प्राचार्य
डॉ. कृष्णात नारायण सांगळे,
व.व. ५९, धंदा नोकरी,
रा. वाडी रत्नागिरी, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.
} लिहून देणार

कारणे लिहून देतो भाडे-करारपत्र पुढील प्रमाणे -

१. मिळकतीचे वर्णन -

कोल्हापूर शहर महानगरपालिका हद्दीमधील कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, शाहु मार्केट, कोल्हापूर येथील रि.स.नं. ४३३/२१७ नवीन प्लॉट नं. ३४५ (शिट नं. ३८८७५) क्षेत्र ४८०० चौ.फूट या मापाची जागा व त्यावरील दुमजली आर.सी.सी. इमारत यांसी चतु:सिमा

पुर्वेस - श्री. जीवनरत्न गणपतराव रोटे यांची मिळकत.
पश्चिमेस - श्री. डी.पी. चंदवाणी यांची मिळकत.
दक्षिणेस - रस्ता.
उत्तरेस - रस्ता.

प्रभारी प्राचार्य

२. करारपत्र लिहून देणार ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० नुसार नोंद झालेली शैक्षणिक संस्था असून, सदर संस्थे मार्फत महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर हे महाविद्यालय चालविले जाते. सदर शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे वर्ग भरविण्यासटी इमारतीची आवश्यकता होती. सदर करारपत्र लिहून घेणार या लिहून देणार या सार्वजनिक न्यासाच्या विद्यमान अध्यक्षा असून, कलम १ मध्ये नमूद मिळकत ही त्यांच्या स्वतःच्या मालकीची आहे.

३. कलम २ मध्ये नमूद केलेनुसार लिहून देणार महाविद्यालयास जागेची आवश्यकता असलेने कलम १ मध्ये नमूद मिळकत ही लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना महाविद्यालयाचे वर्ग भरविण्यासाठी ३० वर्षे मुदतीने विनामोबदला वापरण्यास दिली आहे.

४. कलम १ मध्ये नमूद मिळकत ही लिहून घेणार यांच्या खुद्द मालकीची असून लिहून घेणार या स्वतःच लिहून देणार संस्थेच्या अध्यक्षा असलेने त्यांनी इमारतीच्या वापराबद्दल लिहून देणार संस्थेकडून कोणताही मोबदला घेणेचा नाही. तथापि सदर मिळकतीमधील लाईट बिल, पाणी बिल, महापालिका घरफाळा व तदअनुषंगिक कर हे लिहून देणार यांनी भागविणेचे आहेत.

५. कलम १ मध्ये नमूद मिळकतीचा वापर लिहून देणार हे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे वर्ग भरविणार असलेमुळे जरूर त्याप्रमाणे इमारतीमध्ये फेरबदल फर्निचर व महाविद्यालयच्या वर्गांना अनुषंगिक असे साहित्य लिहून देणार यांनी स्वखर्चाने करून घेणेचे आहे.

६. कलम १ मध्ये नमूद मिळकतीच्या दर्शनी भागावर लिहून देणार महाविद्यालयाचा नामफलक लावणेस लिहून घेणार यांची हरकत नाही.

७. कलम १ मध्ये नमूद मिळकत लिहून देणार यांनी सुस्थितीत ठेवणेची असून, इमारतीची रंग-सफेदी व किरकोळ दुरुस्ती लिहून देणार यांनी लिहून घेणार यांच्या पूर्व परवानगीने करणेची आहे.

८. कलम १ मध्ये नमूद मिळकतीचा वापर लिहून देणार यांनी केवळ महाविद्यालयाचे वर्ग भरविण्याकरीताच करणेचा असून मिळकतीच्या आजूबाजूच्या रहिवाशांना त्रास होईल असे कोणतेही वर्तन करणेचे नाही.

प्रभारी प्राचार्या
महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय
मार्केट यार्ड, कोल्हापूर-४१६००८.

९. सदर करारपत्र लिहून देणार यांनी स्वखुशीने व अक्कलहुशारीने लिहून दिलेले असून, सदर करारपत्र लिहून घेणार व लिहून देणार यांचेवर तो त्यांचे सर्वप्रकारचे वारसांचेवर बंधनकारक आहे.

---

म्हणून लिहून दिले करारपत्र आज तारीख १५/०३/२०१३ रोजीचे दिवशी कोल्हापूर मुक्कामी

ठिकाण - कोल्हापूर

दिनांक - १५/०३/२०१३.

लिहून घेणार ---------------

श्रीमती निवेदिता संभाजीराव माने.

लिहून देणार ---------------

बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट, रुकडी

संचलित महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,

मार्केट यार्ड, कोल्हापूर तर्फे प्राचार्य

डॉ. कृष्णात नारायण सांगळे.

**साक्षीदार -**

१. सही ---------------

नांव --- श्री. व्ही. व्ही. पाटील

पत्ता --- यशवंतराव चव्हाण कॉलनी उजळाईवाडी कोल्हापूर.

२. सही ---------------

नांव --- [illegible]

पत्ता --- [illegible]

प्रभारी प्राचार्या
महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय
मार्केट यार्ड, कोल्हापूर-४१६००५.

TRUE - COPY

I/c. PRINCIPAL
Mahila College of Education
Market Yard, KOLHAPUR- 416005